بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ    نَحۡمَدُہٗ وَنُصَلِّی عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ    وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ

لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصار اللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)    Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in

# جنگ بدر کے حالات وواقعات

خلاصہ خطبہ جمعہ سیّدنا امیر المومنین حضرت مرزا مسرور احمد خلیفۃ المسیح الخامس ایدہ اللہ تعالیٰ بنصرہ العزیز فرمودہ 21 جولائی 2023ء بمقام مسجد بیت الفتوح، مورڈن (یوکے)

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُولُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيمِ. بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيمِ. اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ. الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ. اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ نَسْتَعِيْنُ. اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ. صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ.

तशहहुद, तआवुज आणि सुरह फातिहा पठण केल्यानंतर, हुजूर अनवर म्हणाले: बदरच्या युद्धानंतर, तबकात इब्न सादमध्ये प्रेषितांच्या कैद्यांशी चांगल्या वागणुकीबद्दल नमूद आहे की जेव्हा बदरचे कैदी आले तेव्हा पैगंबराचे काका हजरत अब्बास देखील त्याकैदींमध्ये सामील होते. त्या रात्री पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांना झोप येत नव्हती, तेव्हा सोबती त्यांना विचारू लागले की, हे पैगंबर आपण का जागे आहेत? ते म्हणाले! अब्बासच्या कण्हण्याचा आवाज ऐकून (झोप येत नाही), तेव्हा एक सोबती अब्बासकडे जाऊन त्यांचे बंधन ढिले केले. पवित्र पैगंबर (स.) म्हणाले, काय झालंय, मला अब्बासच्या कण्हण्याची आवाज येत नाही यावर सोबती म्हणाले की त्यांची बंधने कमी केलेत हे ऐकून पैगंबर म्हणाले, मग सर्वांचे देखील बंधने कमी करा.

हजरत साहिबजादा मिर्झा बशीर अहमद साहिब यांनी सिरत खतमुन्नबीय्यीन (स.) या ग्रंथामध्ये लिहिले आहे की पवित्र पैगंबर (स.) यांनी मुस्लिमानांना, कैद्यांशी दयाळूपणे आणि करुणेने वागण्याचे आणि त्यांच्या आरामाची काळजी घेण्याचे आवाहन केले. ते सोबती, जे आपल्या गुरूची आज्ञापालन करण्यास नेहमी उत्सुक असायचे, त्यांनी हा आदेश देखील अशा तऱ्हेने निभावला की इतिहासात याचे दुसरे उदाहरण पहायला मिळत नाही.

सर विल्यम मीयोर यांनी कैद्यांना दिलेली ही दयाळू वागणूक पुढील शब्दांत मान्य केली:

मुहम्मद (स.) यांच्या मार्गदर्शनाखाली अन्सार आणि मुहाजिर (स्थलांतरित मुस्लिम) यांनी काफिरांच्या कैद्यांशी अत्यंत प्रेम आणि दयाळूपणाने वागले, याविषयी काहीं कैद्यांची साक्ष इतिहासात या शब्दांत नोंद आहे: ईश्वर मदीनेच्या लोकांवर अनंत कृपा करो! ते आम्हाला (जनावरावर) स्वार करायचे आणि स्वतः पाई चालायचे, आम्हाला गव्हाची भाकरी द्यायची आणि स्वतः फक्त खजूर खाऊन पडून राहायचे. या चांगल्या वागणुकीच्या प्रभावाखाली काही कैदी मुसलमान झाले आणि अशा लोकांना ताबडतोब मुक्त केले गेले. आणि ज्यांनी इस्लाम धर्म कबूल केलं नाही त्यांच्याशी देखील एक समान वागणूक करण्यात आली.

बदरच्या लढाईबद्दल आणि त्याच्या परिणामांबद्दल असे लिहिले आहे की जेव्हा अब्दुल्ला बिन रवाहा आणि जैद बिन हारिस हे बदरच्या विजयाची सुवार्ता घेऊन मदीनेला पोहोचले, तेव्हा त्यांच्या

तोंडून विजयाची बातमी ऐकून अल्लाहचा शत्रू काब बिन अश्रफ (जो ज्यू अनुयायी होता) ही बातमी नाकारू लागला आणि म्हणाला की जर मुहम्मद (स.) याने या मोठ-मोठया व नामवंत नेत्यांना ठार मारले असेल, तर माझ्यासाठी पथ्वीवर राहण्यापेक्षा पृथ्वीमध्ये जाणे (दफन होणे) उत्तम आहे.

मौलाना शिबली नोमानी त्यांच्या पुस्तकात बदरच्या लढाईच्या परिणामांचे वर्णन करतात की, बदरच्या लढाईचा धार्मिक आणि राष्ट्रीय परिस्थितीवर अनेक परिणाम झाला आणि खरं तर इस्लामच्या विकासाची ती पहिली पायरी होती. कुरैशचे दिग्गज नेते ज्यापैकी प्रत्येक जण इस्लामच्या प्रगतीमध्ये अडथळा होता, ते सर्व नाश पावले.

उतबाह आणि अबू जहलच्या मृत्यूने अबू सुफयानच्या डोक्यावर कुरैश राज्याचा मुकुट ठेवला, ज्याने उमय्या राजवंश आरंभ झाला; परंतु कुरैशांची गुणवत्ता आणि शक्ती प्रत्यक्षात कमी झाली होती. मदिनामध्ये आतापर्यंत, अब्दुल्लाह बिन उबय बिन सलुल प्रत्यक्षपणे विरोधी होता, पण आता तो इस्लामी सत्तेखाली आल्यामुळे आयुष्यभर दांभिक राहिला आणि दांभिकच मरण पावला. या महत्त्वपूर्ण विजयामुळे काफिरांच्या मनात ईर्ष्याची आग वाढली आणि त्यांना ती आटोक्यात आणता आली नाही. कुरैशांना आधी फक्त हजरामीचा आक्रोश होता, बदरनंतर प्रत्येक घरात शोककळा पसरली होती आणि बदरच्या बळींचा बदला घेण्यासाठी मक्केची मुले व्याकूळ होती. आणि सुवैकची घटना आणि ओहदची लढाई या आक्रोशाचेच प्रकटीकरण होते.

हजरत साहिबजादा मिर्झा बशीर अहमद साहिब (र.ज.) म्हणतात की बदरच्या लढाईचा प्रभाव काफिर आणि मुस्लिम दोघांसाठी खूप खोल आणि दीर्घकाळ टिकणारा होता आणि म्हणूनच इस्लामच्या इतिहासात या लढाईला विशेष महत्त्व आहे. पवित्र कुरआनमध्येही या लढाईला फुरकान'चा दिवस असे नाव देण्यात आले आहे, तो दिवस, ज्या दिवशी इस्लाम आणि कुफ्र(सत्य आणि असत्य) यांच्यात उघड निर्णय झाला होता. यात शंका नाही की बदर युद्धानंतर देखील कुरैश आणि मुसलमानांमध्ये भयंकर आणि उग्रपणे युद्ध पेटले, आणि मुस्लिमांना देखील गंभीर क्षणांचा सामना करावा लागला, परंतु बदरच्या पराभवाने मक्का विरोधींची पाठ तुटली होती आणि अतोनात प्रयत्नांनंतरदेखील त्यांना विजयमुख पहायला मिळालं नाही. मृतांच्या संख्येच्या बाबतीत, हा नक्कीच मोठा पराभव नव्हता, कुरैशसारख्या राष्ट्रातील सत्तर चांगले सैनिक मारले जाणे ह्याला राष्ट्रीय आपत्ती म्हणता येणार नाही; मग तो कोणता कारण होता ज्यामुळे बदर युद्धाला यौमुल फुर्कानने प्रसिद्धी मिळाली? या प्रश्नाचे उत्तर देणारे सर्वोत्तम शब्द पवित्र कुरआनने सांगितले आहे आणि ते असे:
يَقْطَعَ دَابِرَ الْكَافِرِيْنَ अर्थात त्यादिवशी विरोधींची मूळ कापली गेली अर्थात बदरयुद्धातील प्रहार हा थेट विरोधींच्या मूळावर झाला ज्याने त्याचे दोन तुकडे झाले.

बदरमध्ये कुरैशांची मुळं खरंच कापली गेली होती, उतबाह आणि शिबा आणि उमय्या बिन खल्फ आणि उकबा बिन अबी मुएत आणि नजर बिन हारीस इत्यादी कुरैशांच्या राष्ट्रीय जीवनाचा आत्मा होतं.

हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) यांनीही याबद्दल लिहिले आहे की, त्यानंतरही मुस्लिमांवर अत्याचार होत राहिले आणि त्यांना काफिरांशी लढाया कराव्या लागल्या यात शंका नाही, परंतु निःसंदेह बदरच्या लढाईने काफिरांची शक्ती पूर्णपणे मोडून काढली आणि मुस्लिमांची शक्ती त्यांच्यासमोर प्रकट झाली. बदरच्या लढाईला पवित्र कुरआनने फुरकान म्हटले आहे, त्याचप्रमाणे बायबलमध्येही याविषयी भविष्यवाणी नमूद आहे. त्याचप्रमाणे पवित्र कुरआनने अकराव्या रात्रीची बातमी दिली होती आणि भविष्यवाणी दिली होती की, स्थलांतराच्या एक वर्षानंतर काफिरांची शक्ति

ध्वस्त होईल आणि मुस्लिमांसाठी विजय आणि सुखाची पहाट येईल. आणि बरोबर एक वर्षानंतर, बदरचे युद्ध सुरू झाले ज्यात काफिरांचे प्रमुख नेते मारले गेले आणि मुस्लिमांनी त्यांच्यावर लक्षणीय वर्चस्व मिळवले.

बदरयुद्धात सामील असलेल्या साथीदारांचे महत्त्व आणि श्रेष्ठतेचा अंदाज यावरून लावला जाऊ शकतो की पवित्र प्रेषित (स.) यांनी या धर्मात महदी प्रकट होण्याचे एक चिन्ह असे अधोरेखित केले होते की, त्याच्याकडे देखील एक पुस्तक असेल ज्यामध्ये बदरच्या साथीदारांच्या संख्येनुसार त्याच्या ३१३ साथीदार नावांची नोंद असतील.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की हदीसमध्ये हे आले आहे की महदीचे एक छापील पुस्तक असेल ज्यामध्ये त्याच्या ३१३ साथीदारांची नावे नोंदवली जातील, म्हणून हे सांगणे आवश्यक आहे की आज ती भविष्यवाणी पूर्ण झाली आहे. हे तर स्पष्ट आहे की, यापूर्वी कोणीही व्यक्ती झाला नाही ज्याने महदी होण्याचा दावा केला असेल आणि त्याच्या काळात छापखाना होता आणि त्याने एक पुस्तक लिहिली असती ज्यामध्ये ३१३ नावे नमूद असते. आणि हे सिद्ध आहे की जर ही गोष्ट मानवी सामर्थ्यात असती तर अनेक खोटे दावा करणारे या भविष्यवाणीचे धारक बनले असते.

शेख अली हमजा बिन अली मलिक अत्-तुसी त्यांच्या जवाहीरूल असरार या पुस्तकात अपेक्षित मसीहाबद्दल लिहितात:

'कदा'नावाच्या गावातून महदी प्रकट होईल आणि मग ते म्हणाले की, परमेश्वर स्वतः त्या महदीची पुष्टी करील आणि लांब-लांबून त्याचे मित्र जमा करतील ज्यांची संख्या बदरच्या लोकांच्या संख्येएवढी असेल, म्हणजे ते ३१३ असतील आणि त्यांची नावे व गुण, छापील पुस्तकात नोंदवली जातील.

अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात:

स्पष्ट असावे की कोणत्याही मनुष्याला हा गौरव प्राप्त झालं नाही की त्याने प्रतिक्षित महदी असण्याचा दावा केला आणि त्याच्याजवळ त्याच्या मित्रांची नावे असलेली छापील पुस्तक असेल. परंतु मी आधीच आईना कमालात ए इस्लाम मध्ये ३१३ मित्र भांवड्यांची नावे नमूद केली आहे आणि आता पुन्हा अंजाम ए आथम ग्रंथामध्ये नमूद करत आहे.

१४वी शताब्दी ही एक अशी शताब्दी आहे ज्याबद्दल स्त्रियांनी देखील घोषणा केली होती की ही शताब्दी शुभ असेल, देवाचे शब्द पूर्ण झाले आणि १४ व्या शतकात सर्वशक्तिमान अल्लाहच्या इच्छेनुसार अहमदचा सदृश प्रकट झाला आणि तो मीच आहे (हजरत अपेक्षित मसीह व महदी) ज्याच्यासाठी बदरच्या घटनेची भविष्यवाणी केली गेली होती, ज्याच्यासाठी पवित्र पैगंबर (स.) यांनी सलाम पाठवला होता. पण, दुर्दैवाने जेव्हा तो काळ आला आणि चंद्रप्रकाश पूर्णपणे प्रकट झालं तेव्हा त्या पुरूषाला स्थार्वी, व्यवसायक म्हणवलं गेलं. काय करंटी आहेत ते ज्यांनी त्याला पाहून देखील पाहिलं नाही आणि त्या काळात वास्तव्य करून देखील ओळखलं नाही. ते मरून गेले जे व्यासपीठांवर चढून रडत होते की, चौदाव्या शतकात हे हे होईल आणि आत ते उरलेत जे व्यासपीठांवर चढून म्हणतात की जो प्रकट झालंय तो लबाड आहे, त्यांना झालं तरी काय! ते का पाहात नाहीत आणि का विचार करीत नाहीत.

यानंतर, हुजूर अनवर यांनी १७ फेब्रुवारी १९०४ ची डायरीतील अपेक्षित मसीह यांची ईशवाणी की, ''बदर युद्धाची गाथा विसरू नका'' याविषयी म्हणालेः अल्लाह आम्हां सर्वांना बदर

युद्धाचे प्रभुत्त्व आणि महत्ता समजण्याचे सामर्थ्य देवो आणि आम्ही पवित्र पैगंबर (स.) यांच्या खऱ्या दासाच्या आगमनाची गरज खऱ्या अर्थाने समजाणारे होवोत, तसेच समस्त मुसलमानही या युद्धाच्या प्रसंगाची हकीगत समजणारे आणि पैगंबराच्या सच्च्या भक्ताला मानणारे होवो जेणेकरून मुसलमान पुन्हा एकदा वैभव संपन्न होतील.

प्रवचन समाप्त करण्यापूर्वी हुजूर अनवर म्हणालेः इन्शाल्लाह पुढच्या शुक्रवापासून जलसा सालाना यु.के. सुरू होणार आहे. या वर्षी तीन-चार वर्षानंतर या सम्मेलनात सहभागी होण्यासाठी बाहेरून पाहुणे येतील. प्रवास करणाऱ्यांचा प्रवास सुकर होवो आणि सुरक्षितपणे इथपर्यंत पोहोचावे आणि सभेचा खरा लाभ त्यांना मिळावा हीच आमची प्रार्थना आहे. तसेच यु.के मध्ये राहणाऱ्यांनी या सम्मेलनात खऱ्या आणि प्रामाणिक भावनेने सामील व्हावे आणि सर्वांचे लक्ष एवढेच असावे की या दिवसापासून आम्ही जास्तीजास्त अध्यात्मिक लाभ घ्यावा.

याशिवाय, हुजूर अनवर यांनी जलसा सालाना मध्ये सेवा करणाऱ्या सेवाकांना संबोधून म्हणालेः पहा जो कोणी या सम्मेलनात सहभागी होत आहे तो खरे पाहता हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांचा पाहूणा आहे म्हणून नेहमी त्यांच्याशी चांगले वागणे अपरिहार्य आहे. तसेच सेवकांना याविषयी काहीं उपदेश दिले गेले आणि पवित्र पैगंबरांच्या वचनांनुसार नेहमी स्मित अवस्थेत राहून पाहूणचार करण्याचा आग्रह केलं. शेवटी हुजूर म्हणालेः अल्लाह सर्व सेवेकांना उत्तमरित्या सेवा करण्याची शक्ति देवो आणि हा सम्मेलन सर्वांसाठी लाभदायक ठरो. या सम्मलेनासाठी सर्वांनी प्रार्थनारत रहावे अल्लाह आम्हां सर्वांना याचे सामर्थ्य प्रदान करो. आमीन.

اَلْحَمْدُ لِلّٰهِ ! اَلْحَمْدُ لِلّٰهِ نَحْمَدُهٗ وَنَسْتَعِيْنُهٗ وَنَسْتَغْفِرُهٗ وَنُؤْمِنُ بِهٖ وَنَتَوَكَّلُ عَلَيْهِ وَنَعُوْذُ بِاللّٰهِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَيِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ يَّهْدِهِ اللّٰهُ فَلَا مُضِلَّ لَهٗ وَمَنْ يُّضْلِلْهُ فَلَا هَادِىَ لَهٗ وَنَشْهَدُ أَنْ لَآ اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَنَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ. عِبَادَ اللّٰهِ رَحِمَكُمُ اللّٰهُ اِنَّ اللّٰهَ يَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِيْتَآءِ ذِى الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْىِ يَعِظُكُمْ لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ اُذْكُرُوا اللّٰهَ يَذْكُرْكُمْ وَادْعُوْهُ يَسْتَجِبْ لَكُمْ وَلَذِكْرُ اللّٰهِ اَكْبَرُ.